सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..

बीड किसान

• संपादक : शेख कामरान •

रमजान मुबारक

रमजान - 20

आज का इफ्तार 06 : 41

कल की सहर 05 : 08

बीड ▪ वर्ष ४ ▪ अंक २०५ ▪ शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ ▪ पोस्टल दिनांक २२ मार्च २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-4 ▪ Issue-205 ▪ Friday 21 March 2025 ▪ Postal Date 22 March 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# पाडळसिंगी ते वडवणी रस्ता प्रकाश दादांनी केला काय अन् लक्ष्मण पवारांनी केला काय लोकांवर उपकार केले नाहीत

## पुढचे राहिलेले वडवणी ते लोखंडीसावरगाव काम लवकर पूर्ण करा

### जगताप अन् आडसकरांचे फक्त प्रचारात मोठमोठ्या शेंगा मारण्याचे काम



**बीड । किसान न्युज**

**लोखंडी सावरगाव ते पाडळशिंगी असा मधल्या मार्गे जाणारा राज्य मार्ग २३२ हा गेल्या ३० वर्षांपासून रखडलेला आहे. या रस्त्याचे पाडळशिंगी ते वडवणी पर्यंतचे काम पूर्णत्वाकडे जात आहे. या पूर्ण होत असलेल्या कामाचे श्रेय सध्या माजलगावचे आ.प्रकाश सोळंके आणि गेवराईचे माजी आमदार लक्ष्मण पवार घेऊ पाहत आहेत. मात्र वडवणी ते लोखंडी सावरगाव हे पूर्ण न झालेल्या रस्त्याच्या कामाचे श्रेय सुद्धा त्यांनीच घ्यायला पाहिजे. अशा प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहेत. दरम्यान तीस वर्षापासून रखडलेले हे काम होणार तरी कधी पूर्ण असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

लोखंडी सावरगाव ते पाडळसिंगी हा राज्य मार्ग २३२ सुमारे ३० वर्षांपूर्वी माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या पुढाकारातून मांडण्यात आला. लातूरकरांना औरंगाबाद आणि जालना येथे जाण्यासाठी हा अत्यंत जवळचा रस्ता पर्याय म्हणून ठरू शकतो. अगोदरच्या रस्त्यापेक्षा सुमारे ४० किलोमीटरचे अंतर यामुळे कमी होते. लातूरकरांना हे फायद्याचे ठरत असल्याने विलासराव देशमुख या रस्त्यासाठी आग्रह होते. मात्र या रस्त्याचे काम ३० वर्षापासून तसेच रखडलेले असून अद्यापही ते पूर्ण झालेले नाही. लोखंडी सावरगाव ते पुढे लातूर कडे जाणारा रस्ता अगोदरच तयार आहे तर इकडे पाडळशिंगी पासून पुढे औरंगाबाद आणि जालना ही रस्ता तयार आहे. पाडळसिंगी ते पाचेगाव, पिंपळनेर, वडवणी, चिंचवन, धारूर ते आडस आणि लोखंडी सावरगाव असा हा ८४ किलोमीटरचा रस्ता आहे. तो पूर्ण झाला तर पाडळसिंगी ते धारूर आणि आडस दरम्यानची जी मधली गावे आहेत त्यांना मोठा फायदा होणार आहे. यासाठी या गावच्या लोकांचा मोठा आग्रह असून, हा रस्ता लवकरात » पान २ वर

### जगताप, आडसकर फक्त निवडणूक लढविण्यापुर्तेच नेते आहेत का?



हा २३२ राज्यमार्ग गेवराई,माजलगाव, केज या तीन मतदारसंघातून जातो पाडळसिंगी ते वडवणी पर्यंत काम पूर्णत्वास आहे. यामुळे गेवराईचा प्रश्न सुटला आहे. तर लोखंडी सावरगाव ते आडसपर्यंत आ. नमिता मुंदडा यांनी ५२ कोटी निधी मंजूर करुन घेऊन रसत्याचे नुतनीकरण करुन घेतलं असल्याने हा रस्ता सध्या खड्डे मुक्त आहे. पण वडवणी ते आडस हा पूर्ण खड्डेयुक्त रस्ता माजलगाव मतदारसंघात येतो. यावर सध्या विद्यमान आमदार प्रकाश सोळंके काही बोलताना दिसत नाहीत. पण माजलगावचे नेते म्हणून घेणारे विधानसभा निवडणूक आली की, सक्रिय होणारे मोहन जगताप आणि रमेश आडसकरांचे या रस्त्यासाठी कधी तोंड उघडलेले दिसून आले नाही. यामुळे हे जगताप आणि आडसकर फक्त निवडणूक लढविण्यापुर्तेच नेते आहेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# वाळू घाट बंद असल्याने हजारो मजुरांवर उपासमारीची वेळ..!

## बांधकाम बंद असल्याने साहित्यांची विक्री थांबली, कामगारांना कामावरून काढले; सरकारचे धोरण कामगाराच्या मुळावर

**बीड । किसान न्युज**

बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू चे अधिकृत टेंडर बंद असल्याने त्याचा बांधकामावर परिणाम झाला असून यामुळे हजारो मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. सोबतच बांधकाम मजूर , मिस्त्री सह व्यवसायिक अडचणीत आले असून, बांधकाम साहित्याची दुकाने अक्षरशः ओस पडली आहेत. अनेक कामगारांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. अनेक महिन्यांपासून हे वाळू घाट बंद असून याला सरकारचे धोरण कारणीभूत आहे. बीड जिल्हा सारख्या मागास जिल्ह्यामध्ये इतर रोजगाराच्या सुविधा उपलब्ध नसल्याने, बांधकाम व्यवसायावरच अनेक मजूर अवलंबून आहेत मात्र आता त्या सगळ्यावर उपासमारीची वेळ आली आहे. गेल्या वर्षभरापासून अधिकृत वाळूचे टेंडर निघाले नसल्याने जिल्ह्यातील बांधकामे बंद पडू लागली आहेत. टेंडर बंद असले तरी चोरट्या पद्धतीने वाळूचा उपसा आणि वाहतूक होत होती त्यामुळे काही ठिकाणी कामे सुरू होती. मात्र आता जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक त्यांच्या अत्यंत कठोर अंमलबजावणीमुळे वाळू उपसा आणि वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. अवैध वाळू उपसा आणि वाहतूक बंदच राहिला हवी मात्र दुसरीकडे शासनाने अधिकृत वाळूचे घाट सुरू करणे आवश्यक आहे. मागच्या वेळी टेंडर काढले त्यावेळी मोजके काही वाळूघाट सुरू करण्यात आले होते आणि केवळ सहाशे रुपये ब्रासने वाळू देण्याचे सांगण्यात आले होते. सरकारच्या या धोरणामुळे वाळू टेंडर सुरूच झाली नसल्याची परिस्थिती होती. एवढ्या स्वस्तात वाळू मिळणार असल्याने या वाळूच्या धंद्यामध्ये सक्रिय असलेल्या माफियांनी या सरकारी टेंडरला विरोध केला आणि ते टेंडर उभेच राहू शकले नाही. त्याचाच परिणाम म्हणून चोरट्या पद्धतीने वाळू » पान २ वर

### पर्यावरण विभागाची परवानगी अडचणीची ठरतेय

अधिकृत सरकारी वाळू टेंडर सुरू करण्यासाठी विविध विभागाच्या परवानगी लागतात. यामध्ये पर्यावरण विभागाकडून देण्यात येत असणारे प्रदूषणासंदर्भातले प्रमाणपत्र महत्त्वाचे मानले जाते. मात्र त्याचे नियम एवढे किचकट आहेत की हे प्रमाणपत्र मिळणे अवघड होऊन जाते. त्याचाच परिणाम म्हणून अधिकृत वाळू उपसा करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. हे दोन्ही विभाग सरकारच्याच अखत्यारित येतात मात्र यामध्ये सरकारी नियमांसोबतच कायद्याचेही बंधन समोर येत आहे. प्रदूषण हा जागतिक विषय असल्याने त्यामध्ये सरकारला फार काही हस्तक्षेप करता येत नाही. वाळू घाट परवानगी देण्यासाठी हा सगळ्यात मोठा अडथळा ठरत असून, सरकारने यावर ताबडतोब तोडगा काढण्याची गरज आहे.

# धनंजय मुंडे विरोधात पुरावा आणून द्यावा

## आमची कारवाईची तयारी : मुख्यमंत्री

**मुंबई । किसान न्युज**

एका वाहिनीला मुलाखत देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध विषयांवर भाष्य केले. यावेळी त्यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी बोलताना धनंजय मुंडे यांच्याविरोधात कुणी आजही पुरावा आणून दिला, तर आमची चौकशीची आणि कारवाईची तयारी आहे, पण उगीच हवेत तीर मारण्यात अर्थ नाही असे फडणवीस म्हणाले आहेत. या मुलाखती दरम्यान बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी अत्यंत प्रोफेशनली तपास केला. आपण जर बघितलं तर या संपूर्ण चर्चेमध्ये धनंजय मुंडे यांचा कुठेही थेट संबंध आलेला नाही तरीही आम्ही धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला, याचा एकमेव कारण असा आहे की, या संपूर्ण प्रकरणांमध्ये ज्याला मुख्य आरोपी केलेला आहे तो वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा राईट हॅण्ड आहे. वर्षानुवर्ष धनंजय मुंडे यांचे राजकारण त्यांनी सांभाळलेला आहे आणि म्हणून सहाजिक महाराष्ट्रातल्या जनतेची अपेक्षा होती की अशा प्रकारे जर नेत्यांच्या जवळचे लोक इतका क्रूर अशा प्रकारचा काम करत असतील तर नेत्यांनी काही ना काही तरी पश्चाताप म्हणून किंवा ज्याला आपण असं म्हणू शकतो. नैतिकतेच्या आधारावर अशा प्रकारचा निर्णय घेतला पाहिजे नंतर किंवा चर्चेत गेल्यानंतर दोन गोष्टी क्लियर झाल्या. एक चर्चेतमध्ये धनंजय मुंडेंचं » पान २ वर



# मुख्याधिकाऱ्यांनी बनावट पत्र तयार करुन आमची बदनामी करु नाये..

## गुन्हा दाखल करण्याचा वाघचौरे, जोगदंड,वाघमारे यांचा इशारा

**बीड । किसान न्युज**

आम्ही वर्षभरापासून बीडच्या मुख्याधिकारी यांची बदली करा म्हणून मागणी करीत असून, आम्ही मागील वर्षी समाधान झाल्याचे लेखी दिल्याचे पत्र मुख्याधिकारी जाहीर केले. ते पत्र बनावट असून, आम्ही असे लेखी दिले नसून ही आमची नाहक बदनामी करण्यात येत आहे. या विरोधात आम्ही कायदेशीर मार्ग स्वीकारुन गुन्हा दाखल करणार असल्याचे माजी नगरसेवक वाघचौरे, जोगदंड, सौ. वाघमारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे इशारा दिला. जिल्हा अगोदरच बदनमा झाला असून आता नगर परिषदेच्या गलथान कारभारामुळे बीड नगर परिषदेची सर्वत्र बदनामी होत आहे नगर परिषदेत कधी काय होईल सांगता येत नाही मुख्याधिकारी यांच्या मनमानी हुकूमशाही कारभारा विरोधात रान उठवणाऱ्या जेष्ठ माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे, अॅड विकास जोगदंड, मा.नगरसेविका पुजाताई वाघमारे यांना बदनाम करण्याचे » पान २ वर



# बीड मतदारसंघातील प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यानी सभागृहात गाजवले

## ग्रामीण भागातील थांबलेली कामे,शहराचा पाणीपुरवठा आदी महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी



**मुंबई । किसान न्युज**

बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.२०) रोजी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघात विकासकामांना मिळालेला निधी कोविड काळात वळविल्याने रखडलेली कामे, ग्रामीण भागातील शाळांची दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी-सुविधा उपलब्ध करणे, रस्ते दुरुस्ती, पुल दुरूस्ती करणे आदी मुद्दे आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात गाजवले. बीड मतदारसंघात असलेले श्री क्षेत्र कपीलधार देवस्थान हे संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्र आणि » पान २ वर

### विमानतळ होतय ही आनंदाची बाब पण....

बीडमध्ये विमानतळ होणार. या कामासाठी निधीची तरतूद करून याबाबतच्या कार्यवाहीला लवकरच सुरूवात करण्यात येईल अशी घोषणा याच आठवड्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार साहेबांनी याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल ना.अजितदादांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. परंतु बीड शहरात रहिवास करणार्या ३ लाख लोकांना पाण्यावाचून कधीपर्यंत वेठीस धरायचे! योजना आणि पाणी उपलब्ध असतानाही नागरिकांचे हाल कधीपर्यंत होऊ द्यायचे? ३६ कोटी रूपयांची तातडीने तरतूद करून बीड शहराचा मुलभूत प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लावला पाहिजे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी बीड शहराच्या जिव्हाळ्याचा असलेल्या पाणी प्रश्नावर केली. त्यासोबतच बीड येथील एमआयडीसीचा विकास करून बीड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा मार्गही सुकर करावा अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली.

# मंडळ अधिकाऱ्याकडून कोर्टाच्या आदेशाला केराची टोपली

**बीड । किसान न्युज**


मौजे वासनवाडी ता.जि.बीड येथील सर्व्हे क्र. १०९/१ मधील ५ एकर जमीनीचा मालकी हक्क जाहिर करुन मिळावा म्हणुन बीड येथील दिवाणी न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.५६१/२०२३ हा न्यायप्रविष्ठ असून त्यामध्ये पुढील आदेश होईपर्यंत महसुल अभिलेखात फेरफार घेऊ नये म्हणुन तुर्त मनाई हुकूमाचा आदेश पारीत केला होता, सदरचा दावा प्रलंबीत असतांना पुरुषोत्तम संजय, विजय, राजेंद्र थिगळे यांनी वाद मिळकतीचे खरेदीखत करुन घेतले व तलाठी कुलकर्णी यांनी फेर घेतला व मंडळ अधिकारी बीड तांदळे यांनी न्यायालयाचे आदेशाची प्रत सय्यद अब्दुल सलाम यांनी दिली असता मंडळ अधिकारी तांदळे यांनी थिगळे बंधु बरोबर अर्थपुर्ण बोलणी » पान २ वर

## खाकीतील माणुसकी



बीड : शहरातील वाहतूक शाखेचे पोलीस कर्यचारी दत्तात्रय उबाळे हे सेवेवर असताना एका अपंग वर्ध्द महिलेला उन्हामुळे होणार त्रास पाहून त्यास रिक्षा मध्ये बसवूनदेत मदत केली.

## शहरात सजले टरबूज,खरबूजांचे गाडे



बीड : उन्हाळा आणि त्यात रमजान महिना सुरु असल्याने टरबूज, खरबूजला खूप मागणी वाढली आहे. यामुळे शहरात विविध ठिकाणी या फळांचे गाडे सजलेले दिसत आहेत.

जागा भरणे आहे

सांय.दैनिक बीड किसान

व्यवस्थापक – १

उप संपादक – १

वरील दोन पदे भरण्यात येणार असून अनुभवींना प्राधान्य देण्यात येईल

:: संपर्क ::

९१४६२५५००५ / ९८९०४६०३५३

पत्ता : दैनिक किसान कार्यालय बशीरगंज चौक बीड

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 90,000

२२ कॅरेट 88,400

चांदी प्रतिकिलो 104,000